INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 130 (B)**

Title of the issue : **The Role of Government to protect the Human Rights**

## SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

**PUBLISHED BY**
Mrs. Swati Dhanraj Sonawane,
Director, Swatidhan International Publications, Nashik

**PRINTED BY**
Shaury Publication
Kapil Nagar, Latur-413512

EDITION :
April 2019

PRICE : 400 /-

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN-2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | March 2019 | UGC Approved No. 40705

# Index


1. Unravelling the Sufferings and Struggles of Dalit Women:Bama's Sangati — 1
   **Vandana Sharma, Dr.Sunita Rani**
2. Partition Literature in English in India — 4
   **More J. G.**
3. Organization Management And MBO : An Overview — 6
   **Dr Padmapani Bhagwan Sawai**
4. Impact of FDI in India — 9
   **Syed Vazeer Syed Isa**
5. Impact Of Gandhian Philosophy On Raja Rao's Kanthapura — 12
   **Dr. Bandal V.S.**
6. Types of Emergencies under The Indian Constitution — 16
   **Prof. Geeta Girwalkar (Sharma)**
7. Gills Rot Disease Of Freshwater Fish Labeo Rohita From Gharni Reservoir, Latur Disrict (M.S.) India — 19
   **Pathan A.V.**
8. An Anaylsis Of Population Growth Of Cattle Market Centeres In Satara District — 21
   **Dr. Shinde Dnyanoba Gorakh**
9. "The Awareness and Use of Contraceptives among Rural Women: With Special Reference to Aurangabad District of Maharashtra" — 26
   **Balasaheb B. Shendge**
10. मराठी कादंबरीचे स्वरुप — 30
    प्रा.डॉ. वारकर विजय गणपतराव
11. गंगाधर गाडगील की कहानियों में चित्रित मुंबई — 32
    प्रा. आर.एम.खराडे
12. मराठी स्त्रीवादी कवितेचे स्वरुप — 35
    **डॉ.सुनीता सांगोले**
13. त्रिवार तलाकचा सुटलेला तिढा — 38
    डॉ. शिवाजी गायकवाड
14. संत स्त्रियाच्या काव्यातून प्रकट झालेले स्त्र–पुरूष नातेसंबंध — 40
    मेनका बा. धुमाळे
15. स्त्री शिक्षण व मानवी हक्क - यावलं तालुक्याचा क्षेत्रीय अभ्यास — 43
    प्रा. डॉ. अशोक खाचणे
16. 'लीळाचरित्र' ग्रंथातून चक्रधर स्वामींनी सांगितलेला उपदेश — 46
    डॉ. सूर्यवंशी रामहरी मधुकर
17. दहशतवाद : राजकीय व सामाजिक परिणाम — 48
    प्रा.डॉ.संतोष गुणवंतराव पाटील.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (B) | March 2019 | UGC Approved No. 40705

# मराठी स्त्रीवादी कवितेचे स्वरुप

डॉ.सुनीता सांगोले
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

---

कविता हा मानवी संवेदना आणि जीवनानुभव नेमकेपणाने अविष्कृत करणारा वाङ्मय प्रकार होय. जगातील सर्व भाषांतील साहित्याच्या निर्मितीचा प्रारंभ कवितेनेच झाला असे मानले जाते. 'कविता' म्हणजे मानवी मनाचा शब्दबद्ध झालेला हुंकार होय. 'कविता' एक स्फूर्तिदायी प्रेरणा असते, ती कवीची भूमिका असते. लढणाऱ्यासाठी कविता शस्त्रही असते आणि शास्त्र ही असते. अशीच एक समतेसाठी चाललेली चळवळ म्हणजे 'स्त्रीवाद', स्त्रीवादी चळवळीतून प्रेरणा घेऊन जन्माला आलेली कविता म्हणजे स्त्रीवादी कविता होय.

स्त्रीचा विविध पातळ्यांवर होणरा कोंडमारा प्रभावीपणे व्यक्त करणे, स्त्रीला दिली जाणारी दुय्यम वागणूक अधोरेखित करणे, 'स्त्री' ला स्वतःचे अस्तित्त्व आहे, बौद्धिक आणि शारीरिकदृष्ट्या ती कमकुवत नाही इ. अनेक दृष्टिकोनातून आजची स्त्रीवादी कविता अविष्कृत होत आहे.

इतिहास पाहताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे अनादी कालापासून आजपर्यंत पुरुष सत्ता व्यापून राहीली आहे. जॉन स्टुअर्ड मिल यांनी 'सब्जेक्शल ऑफ विमेन' या ग्रंथातून पाश्चात्य देशातील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाबद्दल लिखाण केले आहे. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रातही विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्री विषयी पारंपरिक कल्पनाच रूढ झालेल्या दिसून येतात. मुली किंवा स्त्रिया सहनशील असतात ; मूलतः दुर्बल असल्यामुळे त्या धाडसी किंवा आक्रमक असू शकत नाहीत ; त्या महत्वाकांक्षी नसतात ; अशा धारणांचा पगडा सर्वदूर दिसून येतो. समाजाने ठरवून दिलेल्या चौकटीमध्ये नसणारे काही गुणधर्म जेंव्हा स्त्रियांमध्ये दिसू लागतात तेंव्हा समाज विरोध करतो. 'सीमॉन द बोव्हा' या फ्रेंच लेखिकेने म्हटले आहे की, 'स्त्री' कधी जन्माला येत नाही. तर ती 'स्त्री' म्हणून घडविली जाते. जन्माला आलेल्या मुलीच्या मनावर समाजाने नेमून दिलेली चौकट बसविण्याचे काम तिची आई, कुटुंबीय व समाज यांच्याकडून घडत असते. धर्ममार्तंडाच्या स्त्रीविषयक कर्मठ दृष्टिकोनास ताराबाई शिंदे यांनी अत्यंत परखड शब्दात धारेवर धरले आहे. ' स्त्री-पुरुष तुलना' च्या निमित्ताने त्यांनी संस्कृतीतील स्त्री-पुरुष दुजाभावावर कोरडे (ताशेरे) ओढले आहेत.

धर्माने पसरविलेल्या सीता, सावित्रीच्या पुराणकथांनी स्त्रीला जी जगण्याची चौकट घालून दिली ती पराकोटीची हीनत्त्व देणारी त्याच चौकटीतून आजही हा समाज तिचे परिक्षण करतो. तेंव्हा मेनका धुमाळे सारखी नुकतीच लिहिती झालेली कवयित्री आपल्या कवितेतून सवाल उभार करते.

सीते
तू दिलीस अग्निपरीक्षा
आणि दुभंगलेल्या पृथ्वीच्या पोटात
घेतेस चिरविश्रांती आता
लोकनिंदेसाठी तुझा त्याग करणाऱ्या रामाला
देत राहिलीस पावित्र्याचे पुरावे
का केला नाहीस विरोध
कदाचित तुझ्या पावित्र्याचा
संशय घेणाऱ्या रामाचाच
जर तू त्याग केला असतास तर...

द्रौपदीची व्यक्तिरेखा तर अनेक प्रश्न निर्माण करते. भिक्षा वाटावी तशी पाच भावांत (पांडव) तिची वाटणी होते. तिने निवड केली धनुर्धर अर्जनाची पण पांडवांशी तिचा विवाह होतो. तिच्या मनाचे काय ? ठलट एखाद्या वस्तुप्रमाणे तिला द्युतात 'पणाला' लावले जाते. कुठला हा न्याय ? जगभरातल्या सर्वच धर्मांनी स्त्रियांना 'क' पदार्थ लेखून तिच्यावर दासीपण लादले. तिचे मनुष्यत्त्व नाकारले.

आजही स्त्री सक्षम आहे. ती इतिहासाचे परिशिलन करते. तिची दृष्टी स्वच्छ आहे. तिला आत्मविश्वास आहे. धर्माचया नावाखाली आपल्यावर लादला जाणारा अन्याय ती नाकारते. पुराण कथांतील स्त्री प्रतिमांना ती आव्हान देते.

सिसीलिया कार्व्हालो, नीरजा, आसावरी काकडे, कविता महाजन, मिनाक्षी पाटील, मल्लिका अमरशेखर, ज्योति लांजेवार, आश्विनी धोंडगे, प्रज्ञा पवार, अंजली पेंडसे, रजनी परुळेकर...... अशा कितीतरी कवयित्री या स्त्रीवादी जाणिवेतून लेखन करताना दिसतात.

कवितेच्या आधुनिक कालखंडाच्या प्रारंभकाळात पारंपारिक विचारांच्या आवर्तात सापडलेली कविता दिसून येते. म. ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षि धोंडो केशव कर्वे, आगरकर, शाहू महाराज यासारख्या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. शिक्षणाने स्त्रियांना 'स्व' ची जाणीव झाली, तिच्या कडील सुप्त गुणांचा विस्तार झाला. स्त्रियांचे भाव जीवन कवितेतून मुक्तपणे उमदू लागले. तिला उंबरठ्याबाहेर पडण्याची लागलेली असोशी व्यक्त करताना कवयित्री म्हणजे---

"घरातल्या चार सुशोभित वस्तूप्रमाणे
मी एक तुला प्रेम करायला आणलेली वस्तू नाही."

बाहेरच्या जगातील संघर्षाला तोंड देताना अत्यंत अडचणींना तिला सामोरे जावे लागले. हुंडा, बलात्कार, हुंडाबळी, योनीशुचितेच्या अंधश्रद्ध कल्पना अशा प्रथांनी स्त्रीला बळी जावे लागते. महानगरीय संस्कृतीत पुरुषांच्या वासनांना बळी पडलेल्या स्त्रियांचे जखमी शरीर आणि मन त्वेषाने बंड करुन उठले.

"आमच्या आयुष्याच्या नाक्या नाक्यावर
बाजुगिरी करणारे तुमचे लंपट शब्द
इथल्या प्रत्येक आईचा पदर
असंख्य भळभळीनी भरलेला . (मल्लिका अमर शेख)

ही परिस्थिती आजच्या स्त्रीला संपवायची आहे. मल्लिका अमर शेख यांनी आपल्या कवितेतून भारतीय पुरुषी संस्कृतीला दोन हात करण्याचे सामर्थ्य दर्शविते.

रजनी परुळेकर ही स्त्रीवादी भूमिकेतून लेखन करणारी कवयित्री. " काळ तोंडी तू पांढऱ्या पायाची, केस संपल्यावर, स्पर्श या कवितांतून परखड सामाजिक वास्तव प्रकट करते. उपरोधिक शैलीतून समाजाने स्त्रीवर लादलेल्या अन्याय अत्याचाराला त्या वाचा फोडतात.

आज दूरदर्शन सारखे प्रभावी दृक-श्राव्य प्रसार माध्यम लोकमनावर अधिराज्य गाजवतेय. त्याद्वारेही धर्म मार्तंडांच्या स्त्रीविषयक कर्मठ दृष्टिकोनास खत-पाणी घातले जाते. हा दृष्टिकोन पसरविण्याचे काम वेगाने सुरु असलेले दिसते. स्त्रिया देखील स्त्रीला दुय्यमत्व देणाऱ्या भूमिका पसरविणाऱ्या या मालिका मोठ्या चवीने पाहतात. त्यातील देह सजविण्याचे व्रत-वैकल्यांचे, सिच्या सोशिकतेचे, पती परायणतेचे अनुकरण करत राहतात.

**आज बहुआयामी जीवन जगण्यास सक्षम झालेल्या या स्त्रीला आत्मविश्वास आहे. कुटुंब, करिअर, सामाजिक सर्व आघाड्या** सांभाळत येणाऱ्या अडथळ्यांवर मात करत ती विकासाच्या मार्गाने पावले टाकत आहे. स्वतःच्या प्रतिष्ठेबाबतही ती जागरुक झाली आहे. अधिकाराचे पद, व्यासपीठ, आत्मविश्वासाने पेलत आहे. त्यादृष्टिने तिचे कुटुंब त्यात झालेले बदल, समाजाला रुचत नाहीत. पुरुषांना त्यांच्या वर्तनाबाबत का ? म्हणून न विचारणे आणि स्त्रियांना मात्र स्वतःच्या प्रत्येक कृतीची स्पष्टीकरणे न कंटाळता देत राहणे, ही पद्धत आजही रूढ असलेली दिसून येते. बुद्धिजीवी, उच्च पदस्थ स्त्रिया देखील या फासातून सुटल्या नाहीत. समाजकारण, राजकारण, संशोधन **अशी विविध क्षेत्रे पादाक्रांत करताना अनेक घातक समाजधारणांनी स्त्रियांच्या करिअरचे, त्यांच्या आत्मविश्वासाचे प्रसंगी स्त्रियांचे ही बळी** घेतलेले दिसतात. या परिस्थितीचे भाष्य आसावरी काकडे यांच्या कवितेत दिसते--

म्हणून सुरक्षित सुखासन
तिनं घरच नाकारलं
मोकळ्या श्वासांची
किंमत ठरविण्याचा हक्क
तिला सगळ्यांनीच नाकारला होता.
तिच्या एका मनानं सुद्धा !
अन् तरीही तिनं घर नाकारलं ! *(आरसा)*

स्त्रीवादी भूमिकेतून लेखन करणाऱ्या प्रभा गणोरकर यांची स्वतःशी संवाद साधत विकसित होत जाणारी कविता चिंतनाचा मार्ग चोखाळते. पण तिथेच अडकून न पडता मानवी जीवन ती समजून घेते. 'स्व' च्या अस्तित्वाच्या खुणा शोधणारी अभिव्यक्ती त्या करतात. अरुणा ढेरे यांची कविता पुरुषी वृत्ती-प्रवृत्तीवर प्रहार करताना आक्रमक होताना दिसते. संत कवयित्रींच्या स्त्रीवादी भूमिकांचा, मिथक प्रतिमांचा आधार घेत, उपहासात्मक शैलीत त्यांचा विचार प्रकट होतो.

"जनी म्हणे विठ्ठला, रोज येशी शेजेवर
आला दुःखाचा पोटात गर्भ आता शोताकार'
जनी म्हणते निर्दया तुझ्या देहभाराखाली
कोवळ्या कुमारपणीच, हाडमोळी चिरडली
जनी म्हणते, सावळ्या मला नाही तुला लाज
भरी बाजारी खेचिन, तुझा हात विठ्या आज" *(नाचे जन्माकडे)*

आजचे स्त्रीचे जीवन विलक्षण विसंगतीने भरलेले दिसून येते. मोठ्या संख्येने त्या आता उच्चशिक्षित होत आहेत. अर्थार्जन करीत आहेत. मी कोण ? माझं घरातील स्थान काय ? माझ्या जीवनाचा अर्थ काय ? समाजात मला कुठलं स्थान आहे ? असे प्रश्न तिला पडत आहेत. दिवसभर विविध भूमिकांतून जाताना तिला स्वतःला वेळ देणे जमेनासे होतेय. शारीरिक, मानसिक गरजांच्या पलिकडे आता ती विचार करू लागली आहे. एकीकडे असा 'स्व' चा शोध घेणारी ती आणि तिला परंपरेच्या जोखडात बांधू इच्छिणारा 'समाज' या संघर्षात तिची घुसमट होतेय. स्वत्वाच्या लढाईसाठी तिची चाललेली धडपड समाजाकडून पूर्णतः स्विकारली गेली नाही. 'भोगवस्तू' म्हणून स्त्रीकडे **पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नाही. त्यामुळे तिचे 'माणूस' म्हणून जगणे नाकारले जाते. अशा पुरुषी मानसिकतेच्या आरशात स्त्रीचे प्रतिबिंब** डाकोळणार नाही तर काय ? त्यावर अश्विनी धोंगडे मार्मिक अभिप्राय नोंदवतात तो असा--

"तो आरशात जसा असतो तसा दिसतो,

ती आरशात जशी नसते तशी दिसते."

स्त्रीचे पुरुषप्रधान संस्कृतीच्या आरशात उमटणारे प्रतिबिंब या समाजाला इष्ट वाटणाऱ्या चौकटीतून, त्याप्रमाणेच दिसते. तिचे हरपणे, विरुन जाणे समाजाने गृहित धरले आहे. याची जाणीव या ओळींतून होते.

ऊर्मिला चाकूरकर, स्वाती शिंदे-पवार, सीमा साखरे, ज्योति लांजेवार, हिरा बनसोडे, प्रज्ञा लोखंडे, अशा अनेक कवयित्री स्त्रीवादी विचारांनी प्रेरित होऊन काव्य लेखन करताना दिसतात.

**निष्कर्ष :**

1. स्त्रीवादी कवितेतून येणारी स्त्री पारंपारिक भूमिका नाकारुन, स्त्री मुक्तीच्या नव्या वाटा शोधणारी आहे.
2. स्त्रीविषयक पारंपारिक कल्पनांना मूठमाती देणारी ही कविता आहे.
3. आज समाज बदलत चालला तरी स्त्रीविषयक संकुचित धारणा बदललेल्या दिसत नाहीत. हेच या कवितांमधून प्रत्ययास येते.
4. समाजाने धर्माच्या नावाखाली, बुरसटलेल्या विचारांनी लादलेली योनीसुचिता किंवा तिच्या वर्तनाद्वारे केले जाणारे तिचे मूल्यमापन याला प्रखर विरोध करणारी अशी आजची स्त्रीवादी कविता आहे.
5. अर्थार्जन करण्यासाठी किंवा ध्येयपूर्तीसाठी मुक्त वाटचाल करु इच्छिणाऱ्या स्त्रीपुढे निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण आजच्या स्त्रीवादी कवितेतून दिसते.
6. स्त्री जीवनाचा पारंपारिक परिघ तोडून बहुआयामी जीवन जगण्यासाठी तिची चाललेली धडपड आजही समाजाकडून पूर्णतः स्वीकारली गेली नाही. हे प्रखर वास्तव आजही स्त्रीवादी कविता अधोरेखित करते.
7. निर्भिड, वास्तवाभिमुख आणि विद्रोह करणारी आजची स्त्रीवादी कविता आहे.
8. स्त्री ला 'माणूस' म्हणून स्वीकारण्यास अपयशी ठरलेल्या समाजाचा बुरखा फाडणारी आजची स्त्रीवादी कविता आहे.

**संदर्भ :**

1. आधुनिक मराठी कवयित्रींची कविता - रा.ग. जाधव
2. बाई माणूस - करुणा गोखले
3. समकालिकन मराठी कविता : एक निरिक्षण - प्रकाश देशपांडे केजकर
4. स्त्रीवादी समीक्षा : स्वरुप आणि उपयोजन - अश्विनी धोंडगे
5. स्त्री प्रश्नांचा वेध - डॉ. नीलम गोऱ्हे